**Dr. Kirit Somaiya**
**B.Com, FCA, Ph.D.**
*Ex-Member of Parliament*
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

**प्रसिद्धीसाठी**

जून २७, २००८

# मृत्यूचा महामार्ग - पोलीसांनी कंत्राटदाराविरुद्ध खटला दाखल केला

विक्रोळी जंक्शन येथे गोदरेज कंपनी जवळ पूर्व द्रुतगति मार्गाच्या बांधणी आणि दुरुस्तीच्या निकृष्ट कामामुळे अपघातांच्या प्रकरणात झालेल्या असाधारण वाढीसाठी मुंबई पोलीसांनी मे. झूम व्हीसीएपीएल जॉइंट व्हेंचर लि. ह्या कंपनीविरुद्ध खटला दाखल केला आहे.

मुंबई पोलीसांनी भाजप नेता डॉ. किरीट सोमैय्या यांना २६ जानेवारी २००८ च्या दिवशी रात्री उशिरा कळविले आहे कि त्यांनी महानगर दंडाधिकारी यांच्या न्यायालयात नोंदवलेली खाजगी तक्रार अधिकृत म्हणून नोंदवण्यात आली आहे आणि एफआयआर दाखल केला आहेः

“खालील नमूद, तारीख, वेळी व ठिकाणी यातील मे. झूम व्हीएसपीएल जॉइंट व्हेंचर लि. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक केजरीवाल व इतर संचालक यांनी संगनमत करून पूर्व द्रुतगति महामार्ग या विक्रोळी पो. हद्दीतील सार्वजनिक रस्त्याचे पृष्ठीकरण निकृष्ठ व सदोष पद्धतीने केल्यामुळे सदर मार्ग असुरक्षित बनल्याने वाहन अपघात होऊन त्यामध्ये ०६ व्यक्ति मृत्यू पावण्यास आणि ९५ व्यक्ति जखमी होण्यास कारणीभूत झाला तसेच रस्त्याचे भूपृष्ठीकरण करण्याकरिता निकृष्ठ साहित्य वापरून शासनाची फसवणूक केली म्हणून भादंवि कलम ४३१, ३०४ अ, ४२० ३४ अन्वये गुन्हा दाखल”

२६ जून २००८ रोजी दाखल केलेल्या एफआयआरमध्ये असे प्रतिपादन केले आहे किः

“डॉ. किरीट सोमैय्या, हि. ५२ वर्षे, धंदा चार्टर्ड अकाउंटंट, रा. ठि. ९-सी नीलमनगर फेज-२, मुलुंड पूर्व मुंबई-८१ यांनी मे. झूम व्ही एसीपीएल जॉइंट व्हेंचर लि. या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक केजरीवाल व सदर कंपनीचे इतर संचालक यांचेविरुद्ध भादंवि कलम ४३१, ३०४अ ४२०, ३४ अन्वये मा.महानगर दंडाधिकारी ३४ वे न्यायालय विक्रोळी येथे लेखी फिर्याद दाखल केली असता सदरवरून मा. न्यायालयाने सदर फिर्याद सी.सी. क्र. १२/I & R/२००८ प्रमाणे न्यायालयात नोंदवण्यात आलेला असून सदरवरून नमुद फिर्याद हिच प्रथम खबरी अहवाल संबोधून नमूद प्रमाणे एमईसीआर दाखल करण्यात आलेला आहे. - वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई ”

***-प्रसिद्धी सचिव***

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com